# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ५३/२०१९ मधील नि.क्र. २५ वरील आदेश</u>

(CNR NO MHR140003152019)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ व ३ ने त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी विलंबाचे कारण खोटे नमुद केलेले आहे. प्रतिवादी यांनी सरकारी कार्यालयात कागदपत्रे मिळविण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत त्याचा पुरावा दिलेला नाही. त्यामुळे सदर प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादींचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, जाहीर ठरावाकरीता, वाटपाकरीता, खरेदीखत रद्द करणेकरीता तसेच निंरतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ हे दाव्याचे कामी हजर झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ यांना कैफियत दाखल करणेकामी सातबारा उतारे व फेरफार उतारे यांची आवश्यकता होती परंतु तलाठी कार्यालयातून सदरची कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्याने दाव्यास कैफियत दाखल करण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व ३ विरुध्द विना कैफियत आदेश पारीत झालेला आहे. परंतु, सदर प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादीविरुध्द न्यायालयाने पारीत केलेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांची कैफियत मुदतीमध्ये दिली नसल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी क्र. २ व ३

यास खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज रक्कम रु. ३००/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी रक्कम रु. ३००/– वादी यांना देण्यात यावी. |

ठिकाण – उरण
दिनांक – १९.०६.२०२३

(निलेश म. वाली)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.